राळेगणसिध्दी, येथील ''भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास '' या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामाचा आणि कर्तव्याचा तपशिल **''माहितीचा अधिकार कायदा २००५ कलम ४''** प्रमाणे स्वयंप्रेरणेने स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करावयाची माहिती

**१:- संस्थेचे नाव व पत्ता:-** भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास,
मु.पो.राळेगणसिध्दी,ता.पारनेर,जि.अहमदनगर-४१४ ३०२

**२:- संस्थेचे नोंदणी क्रमांक:-** संस्था नोंदणी महा/४६६२/ अहमदनगर दि.१७-०६-१९९७
सा.वि.नो.एफ /४१२२/ अहमदनगर दि.०५-११-१९९७

**३:- रचना** **कार्यकारी मंडळ**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | श्री.किसन बाबुराव हजारे उर्फ अण्णा हजारे |
| उपाध्यक्ष | श्री.अशोक रमेशराव सब्बन |
| सचिव | श्री.शेख अल्लाउद्दीन मकबुल शेख |
| सह सचिव | श्री. रिक्त आहे. |
| खजिनदार | श्री.कर्नल रमेश वासुदेव |
| सदस्य | ॲड.अजित मुरलीधर देशमुख |
| सदस्य | श्री.गजानन ओंकारराव हरणे, |
| सदस्य | ॲड.शामसुंदर लक्ष्मीनारायण आसावा |
| सदस्य | प्रा.बाळासाहेब महादेव हाके |
| सदस्य | डॉ.शिवनाथ बाळकृष्ण कुंभारे |
| सदस्य | प्रा.बालाजी कोम्पलवार |

**४:- संस्थेची ध्येय व उद्दीष्टे :-**

**ध्येय:-** भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकात (उद्दीष्टीका) या ध्येय प्रर्तीची मुहूतमेढ रोवली आहे, ती ध्येय मुर्त स्वरूपात येण्यावर भारतातील सामान्य जनतेचे कल्याण अवलंबून आहे, परंतू दूर्देवाने आज ती ध्येय सामान्य माणसांपासून दूर जात आहेत.

सामान्य जनता दुर्देवी हलाखीच्या खाईत लोटली जात आहे, त्या ध्येयची पूर्ती होण्यासाठी आजच्या घडीला समाज परिवर्तनाची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी विकासाची विविध कामे व भ्रष्टाचार निर्मूलन करणे अत्यावश्यक आहे. ही दोन्ही रथाची चाके आहेत ती बरोबरीने पुढे जाणे आवश्यक आहे. समाज परिवर्तनासाठी भारतासारख्या खंड प्राय देशात ग्राम विकासाचा तसेच समाज परिवर्तनाचा केंद्र बिंदू या देशातील सामान्य माणूस आहे, हा सामान्य माणूस **''निर्भय, सतशिल व स्वाभिमानी ''** असल्या खेरीज हा उद्देश साध्य होणार नाही.

या साठी सामाजिक आणि आर्थीक विषमतेचे निर्मूलन केले पाहीजे. तसेच **" जात, धर्म, लिंग, पंथ "** आदि भेदांमुळे आपल्या समाजात होत असलेल्या अन्याय नष्ट करून सर्वांना विकासाची संधी दिली पाहीजे. सामान्य माणसांचा आत्मविश्वास जागृत्त झाल्यावरच तो समाजातील अनिष्ट प्रवृत्तीची संघर्ष करून समाज परिवर्तन घडवून आणू शकेल. समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेत सार्वजनिक कामकाज **"स्वच्छ व पारदर्शक "** असण्याची खात्री झाल्याशिवाय सामान्य माणूस या कामात रस घेणार नाही.

आजची परिस्थिती लक्षात घेता या कामात भ्रष्टाचाराचा फार मोठी अडसर निर्माण होत आहे. यासाठी भ्रष्टाचार विषयी असलेली चिड जागृत्त व संघटीत करून समाजास पोखरणारी ही भ्रष्टाचाराची कीड दूर करण्यासाठी **'भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाची'** नितांत गरज आहे. म्हणून **"भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास "** ही संस्था खालील उद्देशांसाठी स्थापन करण्याचे ठरविले आहे.

**५:-उद्दीष्टे :-**

१. भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकात (उद्दीष्टीकेत) नमूद केलेल्या तत्वार आधारीत समाजाची उभारणी करणे.

२. समाजातील सर्व प्रकारच्या विषमतेविरूध्द जनशिक्षण व जन संघटन याव्दारे कार्य करून सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे.

३. सर्व् स्तरावरिल भ्रष्टाचार अन्याय व दडपशाही याच्या निर्मुलनसाठी प्रशिक्षण्, न्यायालयात दाद मागणे, कृत्ती कार्यक्रम इ.विधि उपाय योजून शांततामय व लोकशाही मार्गाने जन आंदोलन उभारणे.

४. जनतेला निर्भय व कार्यक्षम बनविण्यासाठी सर्वांगीण विकास कार्याला चालना देणे.

५. स्वराज्याचे सुराज्य होण्यासाठी आवश्यक ते सर्व उपक्रम राबविणे.

६. राष्ट्रीय चारित्र्य घडविण्यासाठी व लोकशाही निर्णय प्रक्रिया मजबूत करण्यासाठी विविध मार्गांनी सतत प्रयत्न करणे.

७. संस्थेस पक्षीय राजकारणापासून अलिप्त ठेऊन लोक शिक्षणाचे व भ्रष्टाचार निर्मुलनाचे कार्य करणे.

**६:- कार्यकारी मंडळ व त्याचे कार्य व अधिकार:-**

**विश्वस्त मंडळ:-**

१. न्यासाच्या उद्दीष्ट प्रर्तीसाठी सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचा व तो राबविण्याचा व त्याबाबत सर्व प्रकारची कार्यवाही करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाला राहील.

२. विश्वस्त मंडळ न्यासाच्या कामकाजावर देखरेख करिल व कामाकाजा बाबत वेळोवेळी पदाधिकाऱ्यांना सूचना करेल.

३. सेवकांच्या नेमणूका करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळास राहील.

४. नैमित्तीक समिती (विषय समिती) न्यासाच्या कामाच्या सोयी करिता वेळोवेळी आवश्यक त्या समित्या नेमण्याचा अधिकार असेल. या समित्यांना केवळ सल्ला देण्याचा अधिकार असेल. समितीच्या अहवालावर विश्वस्त मंडळ निर्णय घेईल व तो निर्णय विश्वस्त मंडळ अमलात आणील.

५. जिल्हा पातळीवर संघटीत झालेल्या कार्यकर्त्यांनी "**भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास**" स्वतंत्र शाखा राज्य समितीच्या देखरेखीखाली व मार्गदर्शिकेतील तत्वाप्रमाणे कार्य करण्यास परवानगी देणे अथवा नाकारणे.

६. मध्यवर्ती न्यासाच्या कार्यकारी मंडळाच्या सल्लयानुसार व मार्गदर्शिकेनुसार जिल्हा/ तालुका अध्यक्ष, जिल्हा/तालुका शाखेतील कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांच्या नेमणूका करिल.

७. जिल्हा शाखेतील आर्थीक बाबी मध्यवर्ती न्यासाचे तयार केलेल्या मार्गदर्शिकेतील तरतूदी नुसार चालेल.

८. जिल्हा शाखेला "**भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासा**" च्या शाखेला कामाचा सर्व खर्च जिल्हा पातळीवरच करावा लागेल. त्यासाठी मध्यवर्ती न्यासाचे वतीने देणगी पुस्तके देण्यात येतील त्यांचा हिशेब मध्यवर्ती न्यासाकडे वेळच्या वेळी सादर करावा लागेल. स्वतंत्र पणे आपापले जमा-खर्चाचे हिशोब ठेऊन सक्षम अधिकाऱ्यांमार्फत त्यांचे लेखापरिक्षण(ऑडीट) करून खर्चांच्या मुळ पावत्या प्रती व अहवालासह त्याच हिशेब मध्यवती कार्यालयाकडे दरवर्षी १५ एप्रिल पूर्वी सादर करावा लागेल. त्याची तपासणी व आक्षेप घेण्याचे अधिकार मध्यवर्ती कार्यकारी मंडळास राहील. जिल्हा शाखेच्या हिशेब व आर्थीक बाबींवर मध्यवर्ती न्यासाचे कार्यकारी मंडळ ठरविल त्याप्रमाणे नियंत्रण राहील.

**७:- अध्यक्षांचे अधिकार व कामे :-**

न्यासाचे अध्यक्ष विश्वस्त मंडळाच्या बैठकीचे अध्यक्ष स्थान भुषवतील, जेव्हा एखाद्या बैठकीला समसमान मते पडतील तेव्हा अध्यक्षांना ज़ादा मत (कास्टींग व्होट) अधिकार राहील. न्यासाच्या कामकाजावर देख़रेख ठेऊन पदाधिकाऱ्यांना सुचना करतील व विश्वस्त मंडळाला आपल्या पाहणीची व सुचनांची वेळोवेळी माहिती देतील.

**८:- उपाध्यक्षांची अधिकार व कामे :-**

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत न्यासाचे उपाध्यक्ष विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षपद सांभाळतील व त्यांना अध्यक्षांप्रमाणे अधिकार राहतील.

**९:- सचिवाचे अधिकार व कामे :-**

न्यासाचा पत्रव्यवहार पाहणे, अध्यक्षांच्या अनुमतीने पत्र व्यवहाराबाबत उत्तरे देणे व निर्णय घेणे ही जबाबदारी सचिवाची राहील. अध्यक्षांच्या अधिकाराखाली सचिव हे न्यासाच्या कामकाजावर देखरेख ठेऊन अध्यक्षांना त्याबाबत वेळोवेळी आपला अहवाल देतील.

**१०:-सह सचिवाचे अधिकार व कामे :-**

अध्यक्षांच्या मार्गदर्शनानुसार सचिवांना कामात मदत करतील.

**११:- खजिनदारांचे अधिकार व कामे :-**

न्यासाचा हिशोब ठेवणे ही खजिनदाराची जबाबदारी राहील. हिशेब, न्यासाला मिळालेल्या पैशांच्या पावत्या देणे, व्हाऊचर्स ठेवणे, न्यासाचे अंदाजपत्रक तयार करून ते विश्वस्त मंडळापुढे मांडणे, न्यासाचे हिशेबपत्रक तयार करून विश्वस्त मंडळापुढे मांडणे, लेखापरिक्षकांडून( चार्टड अकौंटंटकडून) तपासून घेणे व त्याच्या मान्यतेनंतर जरूर ते अधिकाऱ्याकडे सादर करणे ही कामे खजिनदाराची असतील. खजिनदार हे काम स्वत: करतील किंवा इतरांकडून करून घेतील. परंतू या कामाची जबाबदारी त्यांची राहील.

**१२:– सदस्यांचे अधिकार व कामे:–**

संस्थेच्या सर्व कामात सहकार्य करणे, बैठकीमध्ये व मतदानामध्ये भाग घेणे.

**१३:– अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये:–**

मध्यवर्ती न्यासाच्या कार्यकारी मंडळानी ठरविलेली व निर्धारित करून दिलेली सर्व कामे करणे व कार्यकारी मंडळाला न्यासाच्या ध्येय उद्दीष्टे पूर्तीसाठी सहकार्य करणे.

**१४:– कलम २ ज (।) (।।)** प्रमाणे सदर संस्थेस ३१ मार्च २००९ अखेर अथवा आजतागायत कोणतेही राज्य व केंद्र शासनाकडून कोणतेही शासकीय अनुदान प्राप्त झालेले नाही.

**१५:– कार्यालय प्रमुख:–**

श्री.अनिल सुगनचंद शर्मा, सहाय्यक श्री.सुरेश राजाराम पठारे, श्री.सागर दिनकर जांभळकर

**१६:– कामाचा अहवाल कोणत्या कार्यालयाकडे सादर केला जातो:–**

धर्मदाय आयुक्त कार्यालय अहमदनगर

**१७:– कार्यकक्षा:–**

भौगोलिकदृष्टया सर्व भारत – सध्या महाराष्ट्र राज्य

**१८:– ध्येय धोरणे :–**

माहितीचा अधिकार, ग्रामसभा, दप्तर दिरंगाई, बदल्यांचा कायदा, दारूबंदी धोरण इ. लोकहिताच्या कायद्याबाबत लोकांमध्ये प्रबोधन व जागृत्ती करणे, जनहिताचे कायदे करण्यास राज्य अथवा केंद्र शासनाला भाग पाडणे. तसेच संस्कारीत सतशिल नागरिक घडवून त्यांचे संघटन करणे. माहितीचा अधिकार कायदा २००५ च्या उद्दीष्टीकेतील (Preamble) चार हेतू साध्य करणे.

१. भारतीय राज्य घटनेचे प्रस्तापित केलेली लोकशाही प्रजासत्ताक बळकट करणे ( पुढील पिढयांकडे बळकट करून सुपूर्द करण्याची जबाबदारी पार पाडणे) त्यासाठी
२. (बलवान लोकशाहीसाठी) माहिती असणारे नागरिक निर्माण करणे (Informed citizenry)
३. भ्रष्टाचार निर्मूलन समिती घटीत केल्यास शासन आणि त्यांच्या मदतीस संस्था (Instrumentalities) शासितांना (Governed) जबाबदेय (Accountable) असतील.
४. ( तसेच) मर्यादीत आर्थीक (Limited fiscal resource) आणि इतर साधन संपत्तीचा उच्चतम व अधिकतम उपयोग करता येईल.

**१९:– साध्य :–**

१. माहितीचा अधिकार कायदा, ग्रामसभे संदर्भात ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती, दप्तर दिरंगाई, बदल्यांचा कायदा, दारूबंदी धोरण इ संबंधी शासनाने केलेले विविध निर्णय त्यांची अंमलबजावणी करणे.
२. शासन व्यवस्तीतील भ्रष्टाचार, गैर व्यवहार, गैर कारभार, गैर व्यवस्थापना बाबतची वेळोवेळी प्रकरणे शासन दरबारी सादर करून आतापर्यंत ३०० ते ४०० शासकीय अधिकारी व ५ ते ६ मंत्र्यांना निलंबित करण्यात आले आहे.

**२०:– कार्यपध्दती :–**

गाव ते जिल्हा स्तरावर ''**भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यासा** '' च्या शाखा स्थापन करून सामान्य जनेचे प्रश्न सोडविण्याकरिता त्यांना शिक्षण, मार्गदर्शन, प्रशिक्षण देणे, शाखांच्या माध्यमांतून शिबीरांचे आयोजन करून लोकशिक्षण व लोकजागृत्ती करणे व लोकांमध्ये निर्भयता वाढीसाठी प्रोत्साहन देणे. प्रबोधनासाठी स्वयंसेवक तयार करणे तसेच सामाजिक प्रश्नावर वेळ प्रसंगी शासन दरबारी न्याय हक्कासाठी लढा उभारणे त्यासाठी कायदेशिर व सनदशिर मार्गाने व अहिंसेच्या तत्वाने राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान होणार नाही याची काळजी घेत आंदोलन करणे, उपोषण करणे, धरणे धरणे, मोर्चे काढणे, मुक निदर्शने करणे इ.

सनदशिर आंदोलनातून प्रशासनाला स्वत:च्या जबाबदाऱ्या पार पाडायला लावणे, दोषींना दंडात्मक कारवाईतून जबर बसविण्यासाठी प्रयत्न करणे.

या सर्वातून स्वातंत्र्य संग्रामात प्राणांची आहूती दिलेल्या सहा लाखाहून जास्त हौतात्म्यांना न्याय देणारी समाजरचना यावी यासाठी दिलेल्या भारतीय राज्यघटनेला प्रमाणिक प्रतिसाद देणारी ''**निर्भय पिढी**'' व त्यागास तयार असणारी फौज (संघटन) तयार करून स्वातंत्र्याच्या दुसऱ्या लढाईस सुरूवात करणे.

**२१:– स्थावर मालमता:–**

संस्थेची स्थावर मालमत्ता नाही. मध्यवर्ती कार्यालयात कार्यालयील कामासाठी लागणाऱ्या वस्तू उदा. कॉम्प्यूटर, प्रिंटर, फॅक्श मशिन, झेरॉक्स मशिन, टेबल खूर्ची, प्रचार व प्रसार साठी चार मारूती व्हॅन इ. अल्प प्रमाणात आहेत व बँकेत मुदत ठेवीच्या स्वरूपात येणाऱ्या व्याजातून कार्यालयाचे कामकाज व दैनंदिन खर्च चालविण्याचा प्रयत्न केला जातो.

**२२:– कार्यालयीन संरचना तक्ता :–**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | सहसचिव | खजिनदार | विश्वस्त |
| | लिपीक | लिपीक | लिपीक | | |

**२३:– कार्यालयाची वेळ:–**

सकाळी ८ वा. ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत

दुरध्वनी कार्यक्रम :– ०२४८८–२४०४०१, २४००१

फॅक्स क्रमांक :– ०२४८८–२४०५८१

ई मेल :– bvjralegan@gmail.com

कार्यालयीन वेळेनंतर संपर्काची तातडीचा क्र.०२४८८–२४०२२७ रात्री ८ वा.पर्यंत साप्ताहिक सुट्टी व विशेष सेवांचा कालावधी– स्वयंसेवी व सेवाभावी संस्था असल्याने साप्ताहिक सुट्टी नाही. कार्यालयीन स्वयंसेवकांना त्यांच्या गरजेनुसार सुट्टी देण्यात येते. त्यासाठी कार्यालय शक्यतो बंद नसते.

**२४:– कलम क्र.४ (१)( b)( ix) व (x) प्रमाणे स्वयं सेवकांची यादी**

| अ.क्र | स्वयंसेवकांचे नाव | कार्य चालू दिनांक | कामाचे स्वरूप | मानधन प्रति महिना | संपर्कासाठी दुरध्वनी नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.अनिल सुगनचंद शर्मा | २३ मे २००७ | कार्यालयीन प्रमुख | ७०००/– | ०२४८८–२४०४०१ |
| २ | श्री.सुरेश राजाराम पठारे | | सहा.कार्यालयीन प्रमुख | ६०००/–+भोजन व्यवस्था | |
| ३ | श्री.सागर दिनकर जांभळकर | | सहा.कार्यालयीन प्रमुख | ४०००/–+भोजन व निवास व्यवस्था | |

**२५:– कलम क्र.४ (१)( b)( ix) प्रमाणे:–**

दिनांक ०१ एप्रिल २००८–२००९ या कालासाठी मंजूर झालेल्या आणि खर्च झालेल्या तपशिल

**२६:– कलम क्र.४ (१)( b)( Xiv) प्रमाणे:–**

इलेक्ट्रॉनिक स्वरूपता उपलब्ध असलेली माहिती.

| अ.क्र | दस्तऐवज/धारीणी/नोंद वहीचा प्रकार | विषय | कोणत्या प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात माहिती साठविली आहे. | ही माहिती ताब्यात असलेल्या व्यक्तिचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | सभासद नोंदवही | | रजिस्टर | श्री.अनिल सुगनचंद शर्मा |
| २ | बँक व्यवहार | | रजिस्टर | श्री.सुरेश राजाराम पठारे |
| ३ | आवक जावक पत्रव्यवहार | | रजिस्टर | श्री.सागर दिनकर जांभळकर |
| ४ | कार्य अहवाल | | सी.डी.चित्रफित,पुस्तके,पत्रके | श्री.अनिल सुगनचंद शर्मा<br>श्री. सुरेश राजाराम पठारे<br>श्री.सागर दिनकर जांभळकर |

**२७:– कलम क्र.४ (१)( b)( Xvi)प्रमाणे:–**

माहिती अधिकारी, सहाय्य माहिती अधिकारी आणि अपीलीय प्राधिकारी यांची तपशिलवार माहिती

अ) **माहिती अधिकारी:–**

| अ.क्र | माहिती अधिकाऱ्यांचे नांव | अधिकार पद | माहिती अधिकारी म्हणून कार्यकक्ष | संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक | ई–मेल | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनिल एस शर्मा | कार्यालयीन प्रमुख | कार्यालयात उपलब्ध माहिती देणे | मु.पो.राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर ४१४ ३०२ | bvjralegan@gmail.com | श्री.अल्लाउद्दीन मकबुल शेख, सचिव भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास |

**ब) अपिलीय प्राधिकारी:–**

| अ.क्र | अपिलीय प्राधिकाऱ्यांचे नांव | अधिकार पद | अपिलीय प्राधिकारी म्हणून कार्यकक्षा | संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक | अहवाल देणारे माहिती अधिकारी | ई–मेल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.अल्लाउद्दीन मकबुल शेख, | सचिव | माहिती अधिकाऱ्याकडून माहिती उपलब्ध करून देणे | मु.पो.राळेगणसिध्दी, ता.पारनेर, जि.अहमदनगर ४१४ ३०२ | अनिल एस शर्मा | |

**२८:- कलम क्र.४(१)( b)( xi) प्रमाणे:-**

दिनांक ०१ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ या काळासाठी मंजूर झालेल्या आणि खर्च झालेल्या रक्कमेचा तपशिल.

भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास
मु.पो.राळेगणसिध्दी,
ता.पारनेर,जिल्हा.अहमदनगर-४१४ ३०२
फोन नंबर:- ०२४८८-२४०४०१
०२४८८-२४००१०
ई-मेल- bvjralegan@gmail.com